# नमामि देवी अमृते

## (प्रवरा परिक्रमा प्रकल्प)


**लेखक**

**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

**प्रकल्प संघटक मा.अॅड. के. डी. धुमाळ**

अध्यक्ष, श्री अगस्ती ऋषी देवस्थान ट्रस्ट, अकोले, अहमदनगर

मो. ७०२०१५५०६१

**संघटक सहाय्यक : ह.भ.प. राजेंद्र महाराज नवले**

(अध्यक्ष, पायी परिक्रमा)

मो. ९९२१०४९९०६

**रामनाथ मुतडक**

मॅनेजर अगस्ती आश्रम

(परिक्रमा व्यवस्था प्रमुख)

मो. ९८६०९६७०९१, ८६६८९१९६१६



**प्रकाशक**

आनंदोत्सव **चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर**

**महाराष्ट्र, भारत**

**प्रकाशन मंच**

**नमामि देवी अमृते**
Namami Devi Amrute
**(प्रवरा परिक्रमा प्रकल्प)**

**लेखक**
**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे
मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक** : आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष– ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

**प्रथमावृत्ती** : २०२२

**टाईपसेटींग** :
श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर
मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक** : कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर

**मूल्य** ७०/-

विशेष निवेदन : 'आनंदोत्सव'प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.

ग्रंथनिर्मितीचा संपूर्ण खर्च सौ. उषा सहस्रबुद्धे यांनी केला असून, त्यातून मिळणारे उत्पन्न सेवाभावी ट्रस्टना देण्याचा संकल्प केला आहे.

या पुस्तकातील मतांशी प्रकाशन मंच सहमत असेलच असे नाही.

**अमृतवाहिनी प्रवरेस...**

# शुभाशिर्वाद

।। श्रीहरिः ।।



स्वामी गोविन्ददेव गिरि
आचार्य- डी.लिट्. (मानद)
कोषाध्यक्ष,
श्रीरामजन्मभूमि तीर्थक्षेत्र (न्यास),
अयोध्या

'धर्मश्री', सूर्यमुखी दत्तमंदिर के समीप,
पुणे विद्यापीठ मार्ग, पुणे ४११०१६
दूरभाष : (०२०) २५६५२५८९
फॅक्स : (०२०) २५६७२०६९
swamigovindgirijigmail.com

## अर्घ्य अमृत कलशाचे

आदरणीय प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी सुमारे ८-१० महिन्यांपूर्वी 'प्रवरा परिक्रमा' हे पुस्तक माझ्या हातात देत, मी शुभकाम नात्मक प्रस्तावनावजा काही लिहावे अशी, विनंती केली. या अचाट व्यक्तिमत्त्वाला नाही म्हणणे अवघड व तसे म्हटले तरी ते ऐकणार नाहीत म्हणून मी शिष्टाचाराने 'हो' म्हटले. माझ्या कामाच्या धबडग्यात ते माझ्याकडे कुठेतरी पुस्तकांच्या ढिगात पडून राहिले. त्यांचा पाठपुरावा चालूच होता. आता काहीतरी लिहिलेच पाहिजे म्हणून काल रात्री ते हाती घेतले. पुस्तक चाळू लागल्यानंतर काही मिनिटातच डोळ्यात अश्रू तरळले. इतके दिवस हे पुस्तक मी चाळलेही नाही याची खंत जाणवली. बेलापूरची माझी अमृतवाहिनी प्रवरामाई मनश्चक्षूंपुढे साकारली. मी मनाने बालपणीच्या वेगळ्याच भावविश्वात पोहोचलो. त्या वेळचा प्रवरेचा मोठा प्रवाह, सुंदर असे घाट, बुरुजावरून उड्या मारणे, सकाळ-संध्याकाळ पोहणे. बेलापूर-बन-उक्कलगाव अशी त्रिस्थळी यात्रा करणे, केशव-

गोविंदाच्या आरतीमध्ये धुंद होणे हे सर्व काही आठवले आणि डॉ. सहस्रबुद्धे यांनी या ग्रंथातील शब्द सामर्थ्याने पुन्हा त्या वातावरणात नेले याबद्दल त्यांचे पुनःपुन्हा अभिनंदन करावेसे वाटू लागले.

खरोखरी 'आमची प्रवरा ही अमृतधाराच'! समुद्रमंथनातून प्राप्त झालेले पौराणिक अमृत, 'संत सम्राट् श्री ज्ञानेश्वर माउलींच्या श्रीमुखातून श्री मोहिनीराजांच्या नेवाशास स्रवलेले ज्ञानेश्वरीचे अमृत आणि 'ब्राह्मणी' गांवात श्री ज्ञानेश्वर मुखातून प्रवाहित अनुभवामृत या 'अमृत' त्रयीने सारा प्रवराकाठ तर अमृतमय झालाच पण आळंदीश्वराच्या वाङ्मयामृताने अखिल विश्वोद्धाराचा मार्गही मोकळा झाला. अशा धन्य प्रवरामाईची भौगोलिक, ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक कहाणी सश्रद्ध अंतःकरणाने, सखोल अभ्यासाने, अधिकृत पुराव्यानिशी ज्यांत सादर झाली आहे असे हे पुस्तक आहे. पुस्तकाच्या पहिल्या भागात अकोल्याचे अगस्तिमुनी, त्रिस्थळीतील भगवान् केशव-गोविंद, बिल्वतीर्थ, नेवाशाचे मोहिनीराज, प्रवरासंगमचे सिद्धेश्वर व महालक्ष्मी इ. सर्व देवता, भंडारदरा आदि रमणीय स्थळे, या सर्वांचे मनोज्ञ दर्शन लेखकाने इतके प्रभावीपणे घडविले आहे की त्यामुळे खरोखरी एकदा तरी ही 'प्रवरा परिक्रमा' आपण करावी अशी ऊर्मी जागृत होते.

ग्रंथाच्या दुसऱ्या भागात प्रवरामाईच्या संदर्भातील विविध माहितीने पुस्तक अमूल्य बनले आहे. प्रवरातीरावरील वनवासी बांधवांच्या जीवनशैलीचा परिचय, प्रवराकाठचे गड-किल्ले, भंडारदरा धरण, रंध्याचा धबधबा, जूनमधील काजवा महोत्सव, किल्ले रतनगड, निळवंडे धरण, महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर कळसुबाई, प्रवरातीरावरील साखर उद्योगाने घडविलेली अर्थक्रांति इत्यादी विषयांबाबत विभिन्न लेखकांनी लिहिलेल्या लेखांचे आलोडन केले असता या पुस्तकाचे सौंदर्य व महत्त्व सहजच प्रत्ययास येते.

ग्रंथाच्या शेवटी दिलेल्या अनेक मानचित्रांनी, स्थळांच्या याद्यांनी व छायाचित्रांच्या संग्रहाने ग्रंथाच्या पैठणीला समृद्धीची किनार

लाभली आहे. हा आद्योपांत ग्रंथ म्हणजे जणू भावामृत कलशाच्या अर्घ्याने साधलेली अमृत वाहिनीची वाङ्मय पूजाच होय! या सौष्ठवपूर्ण, संग्राह्य ग्रंथाचे लेखक डॉ. अनिल सहस्रबुद्धे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. उषाताई यांचे पुनःपुन्हा हार्दिक अभिनंदन! अशा प्रकारचा स्थानिक इतिहास खरे तर सर्वच नद्यांचा लिहिला जायला हवा. या लोकमातांच्या वात्सल्याने झालेली संस्कृतीची जडण-घडण साहित्य रूपाने साकारली तर वर्तमान व भावी पिढ्यांसाठी ती अमृतमय प्रेरणा ठरेल यात संशय नाही. सर्वांनी संग्रही ठेवावे व नवीन पिढीने तर अवश्य वाचावे असे सुंदर सारस्वत-धन प्रदान केल्याबद्दल लेखक व प्रकाशक यांच्यासाठी सधन्यवाद शुभकामना!!


जय जय केशव गोविंदा!

**श्री ज्ञानेश्वरपदाश्रित**

स्वामी गोविंददेवगिरि

पौष शु. १० युगाब्द ५१२३
स्वामी विवेकानंद जयंती दि. १२/०१/२०२२
हामी गोनिदेवगिर

# शुभाशिर्वाद



जगद्गुरू द्वाराचार्य (जगद्गुरू श्री विठ्ठलनाथजी तथा जगद्गुरू तुकारामजी)

**विद्यावाचस्पती डॉ.रामकृष्णदासदेवाचार्यजी महाराज लहवितकर**

संतकुटिया, लहवित, ता.जि.नाशिक

संपर्क : ९८२२३३९१३० इ-मेल: lahavitkarmaharaj@gmail.com

**संमेलनाध्यक्ष –**

- सातवे अखिल भारतीय मराठी संतसाहित्य संमेलन, गोंदिया (विदर्भ), २०१८
- पहिले वारकरी कीर्तन संमेलन, सदाशिवनगर, सोलापुर, २०१८

- महाराष्ट्र शासन ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार २०२१

- मा. प्रमुख व प्राध्यापक, संत तुकाराम महाराज मराठी संस्कृती अध्यासन सा.फु.पुणे विद्यापीठ

- संतसाहित्य व भारतीय तत्वज्ञानाचे समिक्षक व संशोधक, प्रबंधलेखक

## विज्ञापना

प्रवरा म्हणजे प्रकर्षेन बरा, अर्थात विशेषत्वाने श्रेष्ठ, प्रवरा नदीची नामोपत्ती महर्षी व्यास रचित ब्रह्मांड पुराणात सांगितलेली आहे. 'पर्वरा' म्हणजे श्री भगवान विष्णुच्या पर्वापासून जन्मलेली, परंपरेने ह्या दोन्ही अर्थाने व्युत्पत्ती मानली जाते. 'पर्वरा' हे नाव तीला अगस्त्य महामुनींनी दिले आहे. मोहिनीरूपात भगवती देवीने राहूच्या हृदयाला छेदून जे अमृत बाहेर काढले त्याचीच ही अमृतवाहिनी प्रवरा नदी होऊन वाहत निघाली आणि अगस्त्य आश्रमात आली. पुढे धादरफळ-कोल्हार, राहुरी-नेवासा टोके-कायगाव इ. क्षेत्रांना पावन करीत पुण्यसलीला गोदावरीस संगम पावलेली आहे. प्रवरेचा जन्मदाता रतनगड ते गोदावरी-प्रवरा संगमापर्यंतचा हा पवित्र-पुण्यपावन काठ (तीर) आहे.

रतनगडाच्या पायथ्याशी असलेले अमृतेश्वर मंदिर, पुढे घोरपडादेवी शक्तीपीठ, खंडेश्वर (म्हाळादेवी) देवस्थान, इंदोरी तीर्थक्षेत्र, महामति आश्रम राममाळ, अगस्त्याश्रम अकोले, रामेश्वर क्षेत्र, खांडेश्वर, जोर्वे तीर्थक्षेत्र, हरिहर क्षेत्र बेलापूर, मोहिनीराज मंदिर – श्री ज्ञानेश्वरी जन्मस्थान नेवासा, कायगाव टोके-संगम-सिद्धेश्वर इ. प्रवरेच्या

काठावरील तीर्थक्षेत्र उपासनेची महान केंद्र बनली आहेत.

अगस्ती ऋषींचा मूळ संदर्भ - समुद्रमंथनाची अपूर्व कथा, राजा हरिश्चंद्राची कथा, रामायण काळातील प्रभुरामाशी संबंधित राम अगस्त्यमुनी भेट, सीताहरण प्रसंग, तसेच महाभारतकालीन संदर्भही याच परिसरात घडल्याची सांस्कृतिक नोंद आहे. अमृतेश्वर-उगमस्थान आणि कायगाव टोका संगम या स्थानाच्या पावित्र्याविषयी प्राचीन कालापासून, सांप्रत कालापर्यंत पौराणिक व संत साहित्यातून नोंदी उपलब्ध आहेत.

नदीच्या उगमापासून संगमापर्यंत नियम व व्रतस्थ राहून केलेली पायी वाटचाल, दोन्ही काठावरील परिभ्रमण म्हणजेच 'परिक्रमा' ही उपासना प्रचलित झाली. यादृष्टीने लोकसाहित्य व लोकसंस्कृती थोर अभ्यासक व महाराष्ट्र प्रांतातील सिद्धहस्त ख्यातकीर्त संतसाहित्याचे समीक्षक प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे सर यांच्या सत्यसंकल्पनेतून, आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट अहमदनगर यांच्यावतीने, त्यांच्यासह अनेक विचारवंत-अभ्यासकाच्या एकत्र लिखाणातून पुण्यसलीला 'प्रवरा परिक्रमा' अभूतपूर्व ग्रंथ प्रकाशित होत आहे. ही अतिशय उल्लेखनीय व विलक्षण घटना आहे. लोकसंस्कृतीचे अभ्यासक म्हणून त्यांचा पूर्वपरिचय संपूर्ण महाराष्ट्राला आहे. येत्या दोन दशकापासूनचा आपल्या आयुष्याचा अधिक काळ प्राचार्य डॉ. सहस्रबुद्धे सरांनी भारतीय तत्त्वज्ञानाच्या व संतसाहित्य प्रचार-प्रसारासाठी प्रतिव्यय केला आहे ही अभिनंदनीय बाब आहे.

'परिक्रमा' हे उपासनाचे एक अंग आहे. मंदिरामध्ये देवतेच्या आरतीनंतर स्तुती-वंदना-प्रार्थना-नमस्कारादि झाल्यानंतर प्रदक्षिणा-परिक्रमा करूनच प्रसाद ग्रहण करण्याचा शास्त्रविधी आहे.

''यानि कानिच पापानि जन्मान्तर कृतानिच ।
तानि तानि प्रणश्यन्तु प्रदक्षिणा (परिक्रमा) पदे पदे ।।''

या मंत्रात उल्लेख आहेच. वर्तमान आयुष्य व जन्मान्तरात घडलेले पाप प्रदक्षिणा-परिक्रमेने विनष्ठ होते अशी आपली भावना आहे. प्राणिमात्र पापकर्माच्या परिणामस्वरूपाचे दुःख भोगतो आणि दुःखाची निवृत्ती सर्वांनाच अपेक्षित आहे त्याप्रमाणे परमसुखाची देखील इच्छा

असते. म्हणूनच पुण्यकर्मानेच सुखाची प्राप्ती होते हा धर्मसिद्धान्त आहे. अर्थात पुण्यपवित्र अदृष्ट फल, अंतकरणाची शुद्धी, मनाची पवित्रता या उपासनारूप परिक्रमेचे फल असते, ज्या परिक्रमेचे साधक श्रद्धेने अंगीकार करतो.

आपल्या भारतीय परंपरानुसार परिक्रमेला फारच महत्त्व आहे. अनेकांनी परिक्रमेचे अनुसरण करून मूल्य संवर्धित केले आहे.

(अ) श्री गणपतींनी आपल्या शिवपार्वती मातृ-पितृतत्त्वास प्रदक्षिणा करून, सर्वांत अग्रपूजेचा मान संपादित केला.

(ब) महर्षी गौतमांनी प्रसवित गाईस परिक्रमा करून, पृथ्वीच्या प्रदक्षिणेचे श्रेय मिळविले.

(क) महर्षी मार्कण्डेयांनी भगवती नर्मदेस प्रथम परिक्रमा करून अमरत्व प्राप्त केले.

(ड) महर्षी व्यासांनी गोदावरी परिक्रमा करीत, उत्तर तीरांवर कुमारांचलगिरी पर्वतावर-पायथ्याशी भगवती सरस्वतीची स्थापना करून अनुष्ठान केले त्यायोगे त्यांना दिव्य कवित्व करण्याची अपूर्व स्फूर्ती प्राप्त झाली.

(इ) ब्रह्मदेवाचे मानसपुत्र सनक-सनकादिकांनी आपआपल्या परीने परिक्रमा करून सामर्थ्य प्राप्त केले.

(ई) सूर्याभोवती चंद्र-ग्रहादिकसह पृथ्वी परिक्रमा करते ही बाब वैज्ञानिकांनी सिद्ध केली आहे.

(ए) कालचक्रही सर्व विश्वाभोवती परिक्रमाच करते.

अर्थात परिक्रमा साधताना साधु-संत-जपी-तपी-सिद्धयोगी या सर्वांनाच तसेच शास्त्र-पुराणे इ. ग्रंथांनी अनुमोदित केलेली आहे.

''नामा म्हणे प्रदक्षिणा । त्याच्या पुण्या नाही गणना ।
जैसे केले तैसे घालू लोटांगण । करू प्रदक्षिणा नमस्कार ।।''

अशा तऱ्हेने नर्मदा-गोदावरी अन्यही महानद्यांना परिक्रमा करण्याची परंपरा पूर्वसूरींपासूनच चालत आलेली आहे. खरे तर 'परि' म्हणजे सभोवार 'क्रमा' म्हणजे फिरणे. दक्षिण म्हणजे उजवी बाजू, उजव्या

बाजूस अधिष्ठानास ठेवून फिरणे म्हणजे परिक्रमा असा व्युत्पत्तीमूलक अर्थ होतो.

आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे सरांच्या सत्यसंकल्पनेतून, आपल्या सर्वांच्याच समग्र अभ्युदयासाठी पुण्यसलीला 'प्रवरा परिक्रमा' या अतिशय जिव्हाळ्याच्या विषयास अनुसरून या ग्रंथाची सोपपत्तिक मांडणी करून ठेवली आहे. प्रवरा खोरे-अगस्ति आश्रम-महामती आश्रम अकोले तीर्थक्षेत्र हा अनुबंध ठेवून आपल्या प्रवरामातेची यथोचित परिक्रमा घडावी, तशी प्रेरणा व्हावी अशी भावनात्मक धारणा लक्षणीय आहे. प्रवरा म्हणजे प्रकर्षन्-वरा म्हणजे श्रेष्ठ असा अर्थध्वनीत होतो.

महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील सह्याद्री डोंगरामधील कुलंग व रतनगड या दोन किल्ल्यांच्या डोंगरप्रदेशातून 'प्रवरा' उगम पावून पुढे-पुढे प्रवाहित होते. तातोबा आश्रम-महामती-अगस्ती-धौम्य इ. महापुरुषांचे आश्रम पावन करीत, अनेक जागृत-प्रभावी देवस्थानांना संक्रमित करीत ''का फेडीत पापताप । पोरवीत तीरीचे पाद्य'' या न्यायाने श्रीक्षेत्र कायगांव-टोके, ता. नेवासा येथे सिद्धेश्वर चरण सान्निध्यात 'गोदावरी' महानदीस मिळते. म्हणूनच वाम-सव्य किनाऱ्याचा-तटाचा विचार करता दोन्ही बाजूने ४६०-४७५ कि.मी.चे अंतर असा परिक्रमा प्रवास आहे.

प्रस्तुतचा 'प्रवरा परिक्रमा' ग्रंथ उपासक व अभ्यासक यांना एकत्रित आणणारा साक्षेपी प्रबंधच आहे. अभ्यास परंपरा व संशोधन पद्धतीचा समन्वय करणारी मांडणी या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. भारतातील नव्हे तर वैश्विक अभ्युदय व परमकल्याण साधणारा या ग्रंथाचे संपूर्ण मानवी समूहाने अनुसरण-अनुकरण करून अभिष्ट करावे. या ग्रंथाकृतीचा सर्वांनीच अत्यादर करावा ही विज्ञापना.

**आ. विनित**
**जगद्‌गुरू द्वापाचार्य विद्यावाचस्पति**
**डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर**

●●●

# शुभाशिर्वाद



**श्री दत्त मंदिर संस्थान**
श्री क्षेत्र देवगड,
ता. नेवासा, जि. अहमदनगर
प. ट्र. र. नं.A ८५८ ☎ : (०२४२७) २०३१११
Email : dattadeogad@gmail.com



जावक क्र. दिनांक १३/०१/२०२२

पुण्यसलीला प्रवरामाईचा उल्लेख पौराणिक तसेच विविध संत साहित्यात आलेला असून उगमापासून संगमापर्यंत पौराणिक संदर्भ असलेली विविध धार्मिक स्थळे प्रवरामाईच्या दोन्ही तीरावर वसलेली आहेत. तिला जनसामान्यात अत्यंत आदराचे स्थान प्राप्त झालेले आहे. तथापि गंगामाई, नर्मदामाई तथा दक्षिणगंगा असलेल्या गोदामाई संदर्भात ज्या प्रमाणे अधिकृत लिखित साहित्य उपलब्ध आहे त्याप्रमाणे पौराणिकदृष्ट्या महत्त्वाची असलेली प्रवरामाई साहित्यिकदृष्ट्या उपेक्षितच राहिली आहे.

याच अनुषंगाने लोकसंस्कृती तथा संतसाहित्याचे गाढे अभ्यासक आदरणीय प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे सर यांनी नुकतेच 'प्रवरा परिक्रमा' हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकामध्ये सरांनी प्रवरामाईचे उगमस्थान असलेल्या रतनगडापासून गोदा-प्रवरेच्या संगमा दरम्यान असणाऱ्या विविध स्थळांची तपशीलवार माहिती सचित्र व अधिकृत पुराव्यानिशी दिलेली आहे. यामध्ये सर्वसामान्यांना अनभिज्ञ असणाऱ्या अनेक बाबींचा समावेश असल्यामुळे हे पुस्तक प्रवरामाईच्या अभ्यासकांसाठी तसेच सर्वसामान्यांसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरणार आहे. हे पुस्तक वाचतांना क्षणोक्षणी प्रवरामाई डोळ्यासमोर उभी राहते आणि आपणही एकदा तरी 'प्रवरा परिक्रमा' करावी अशी भावना जागृत

होते.

सरांनी अतिशय ओघवत्या भाषाशैलीत लिहिलेले 'प्रवरा परिक्रमा' हे पुस्तक अतिशय उत्कंठावर्धक झालेले आहे. पुस्तकाचे वाचन करतांना त्यांनी घेतलेल्या अपार कष्टाची आणि अभ्यासाची जाणीव होते. आपल्या भावी पिढ्यांसाठी हे पुस्तक निश्चितच 'अमृताचा ठेवा' असणार आहे, यात शंका नाही.

सरांनी अतिशय सुंदर असे हे पुस्तक लिहिल्याबद्दल व तितक्याच उत्साहाने ते प्रकाशित करणाऱ्या प्रकाशकांचे हार्दिक अभिनंदन. सरांचे हातून अशाच प्रकारची उत्तमोत्तम साहित्यनिर्मिती होत राहो व त्यासाठी त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो, ही भगवान दत्तात्रेयांचे चरणी विनम्र प्रार्थना व्यक्त करून लेखन सीमा.

इति शम् !



श्रीगुरुदास

भास्करगिरी गुरु किसनगिरीबाबा,

श्री दत्त मंदिर संस्थान, श्री क्षेत्र देवगड.

# (१)

## ।। नमामी देवी अमृते ।।

# पुण्यमयी प्रवरा

नगर जिल्ह्याच्या उत्तर भागाची जीवनदायिनी म्हणूनच प्रवरा नदीचा परिचय आहे. विशेषतः साखर उद्योगामुळे प्रवरा नदीचे महात्म्य अधोरेखित झाले आहे. अतिप्राचीन काळात उगम पावलेली ही नदी लक्षावधी वर्षांपासून बारमाही वाहणारी नदी आहे. अलीकडे ब्रिटिश काळात भंडारदरा येथे नदीवर धरण बांधण्यात आले आणि या धरणाच्या नियोजनामुळे साखर उद्योगाला चालना मिळाली. शेतजमिनी ओलिताखाली आणून; कृषीउद्योगाचा विकास घडू लागला. आता निळवंडे धरणासह अनेक छोटे बंधारे प्रवरा नदीवर बांधले गेले आहेत. त्याचबरोबर पाटपाणी योजना कार्यान्वित झाल्या आहेत. बागायती शेतीमुळे उत्तर नगर जिल्हा विशेष संपन्न झाला आहे. प्रवरेच्या उपनद्यांचे अर्थात कृष्णवंती, म्हाळुंगी, आढळा, मुळा यासह अनेक छोट्या नद्या, यांचे प्रवाह प्रवरेत मिसळले गेले आणि प्रवरा म्हणूनच प्रवाहित होत; प्रवरासंगम-कायगाव टोका येथे गोदावरीला मिळाले. 'प्रवरा पानम् - गोदास्नानम्' या प्राचीनतम धारणेला विशेष महत्त्व आले.

प्रवरेच्या तीरावर सुमारे पन्नास हजार वर्षांपूर्वीही उत्तम संस्कृती नांदत होती; असे उत्खननात स्पष्ट झाले आहे. निरनिराळ्या ठिकाणच्या ऐतिहासिक व पुरातत्त्वशास्त्रीय उत्खननानुसार, सलग असा दहा हजार वर्षांचा इतिहास मांडता येतो. प्रवरा तीरावरील प्रागऐतिहासिक,

सांस्कृतिक, पौराणिक, दैवतकथांचे, ऋषीकथांचे, लोकगंगेतील मौखिक पारंपरिक अवशेष, प्रवरेचे प्राचीनतम सांस्कृतिक वैभव ठळकपणे मांडतात. प्राचीन शिल्पशैलीतील मंदिरे या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवितात.

अमृतमंथन प्रसंगापासूनचे संदर्भ आणि विशेषतः वाल्मिकी रामायणातील श्रीराम, महर्षी अगस्त्य आणि हनुमान यांविषयी मौखिक परंपरांमधील कथात्म अवशेष पाहिले; तर महर्षी अगस्त्य यांचे गुरुकुल, अगस्त्य विद्या प्रसार, त्यातही विशेषतः कृषी, आरोग्य विद्या प्रसार आणि समाधीसाधना यांसंबंधातील परंपरा, पुण्यमयी प्रवरेचे महात्म्य विषद करतात. प्रभु रामचंद्रांच्या वननिवासातील महत्त्वाचा काळ प्रवरा तीरावर व्यतित झाला आहे, याचे स्पष्ट उल्लेख वाल्मिकी रामायणात आहेत. प्रभु रामचंद्रांनी अमृतवाहिनीची परिक्रमा करीत शिवाराधना केली असावी; याचा स्पष्ट संकेत स्थानमहात्म्य सांगणाऱ्या मौखिक परंपरेतील कथांमधून स्पष्ट होतो. उदा. सिद्धेश्वर, रामेश्वर, कोल्लाळेश्वर आदी.

प्राचीनतम सह्यगिरीच्या कुशीतून वाहणाऱ्या या अमृतधारेचे महात्म्य अपार आहे. वेदोपनिषदे यांपासून ते भावार्थदीपिका आणि अमृतानुभवापर्यंत; या अमृतधारेने ज्ञानसंजीवन सर्वांना दिले. प्रवरेच्या दातृत्वाने तिच्या मांडीवर मळे फुलले. आज मात्र ही मातृदेवता आपल्याच संतानांच्या आधीनतेने, आपल्या पारंपरिक पुण्यमयी प्रवाहाबाहेर, दोन्ही तीरावरील संतानांची न शमणारी तहान शमविण्याचा प्रयत्न करीत; स्वतःचे पात्र कोरडे, प्रसंगी गटारांना सामावणारे घेऊन; उजाडपणे मिरविते! महर्षींच्या अर्घ्यप्रदानाने, प्रभु रामचंद्रांच्या स्नानाने आपला अमृतश्राव घेऊन; अधिकाधिक पुण्यमयी करून; नदी, आपल्याच संतानांचा बुभूक्षित आक्रोश, जीवाच्या आकांताने सहन करीत, त्यांच्याच नियोजनाप्रमाणे प्रवाहित होऊन; वाहण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे! औद्योगिक प्रगतीच्या स्पर्धापूर्ण युगात, कलीच्या

प्रभावी संघर्षात्मक उपद्रवांना सांभाळीत पसायदानाची कांक्षा पुन्हा पुन्हा जागवीत आहे. यात भर म्हणून की काय अनेकानेक मुराद पर्यटक भंडारदरा, नेवासा, शनिशिंगणापूर, शिर्डी, प्रवरासंगम, देवगडच्या पर्यटनासाठी येतात आणि श्रद्धा, सबुरी, समृद्धीचे भान न ठेवता, भोगपूर्ण आनंदमग्न होतात. तरीही प्रवरामाय त्यांच्याकडे स्नेहाळ नजरेने पाहाते.

प्रदूषण, पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे, सरिताओघाचे सातत्य व सौंदर्य जोपासून आणि तीर्थक्षेत्र विकास, पर्यटन विकास, सेवा आणि श्रद्धा या सर्व गोष्टींविषयी जनजागृती करण्यासाठी आणि पर्यटकांचे लक्ष वेधून; रोजगाराच्या संधी निर्माण होऊन; स्थानिकांना स्थिर, अधिक प्रगत आणि समाधानी जीवन प्राप्त व्हावे; यासाठी 'प्रवरा परिक्रमा प्रकल्प' आयोजित करणे आवश्यक आहे. या प्रकल्पात प्रवरा तीरावरील ग्रामस्थ, समाजधुरिण, प्रतिष्ठित, व्यावसायिक, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि विद्यार्थीगण, विविध संप्रदायांचे पायिक, पक्षोपपक्षांचे नेते अशा सर्व भूमिपुत्रपुत्री तथा प्रवरापुत्रपुत्री अर्थात बंधुभगिनींनी पुढाकार घेऊन; प्रवरासेवा, संस्कृती उपासना यांत झोकून देणे आवश्यक आहे.

प्रवरा परिक्रमेच्या प्राचीनतम अशा परंपरेचे पुनरुत्थान करणे आणि नवपरंपरा प्रस्थापित करणे; हे सर्वांचे कर्तव्य आहे. वैचारिक स्वरूपातील आणि अन्य सर्व प्रकारचे मतभेद दूर ठेवून; अमृतवाहिनी प्रवरेचे अमृत दिव्य पावित्र्याने सर्वांपर्यंत पोचविण्याचे व्रत अंगिकारले पाहिजे.

चला, स्वतः परिक्रमा करा, इतरांना परिक्रमेला प्रवृत्त करा, परिक्रमा साधकांचे गावोगावी स्वागत आणि सेवा करण्यास सिद्ध व्हा. प्रवरा प्रवाहाचे पांग फेडून जीवन कृतार्थ करा.

●●●

# अ) प्रवरा नदीची दिव्य नावे

श्री शिवपार्वती महर्षी अगस्त्य आणि ब्रह्मर्षी नारद यांच्या विनंतीनुसार अमृतकलशातून भगवान श्री विष्णू अर्थात मोहिनीस्वरूपा, यांनी अंगुष्ठ स्पर्शाने मानवांसाठी अमृतधारा प्रवाहित केली. म्हणून 'अमृतवाहिनी' रत्नगडातून प्रकटली. हे 'अगस्त्य महात्म्य' ग्रंथात स्पष्ट केले आहे.

श्री ब्रह्मदेवांनी या नदीचे सुवर्णासमान तेजस्वी आणि मौल्यवान नदी, असे वर्णन करून; सर्व देवदेवतांना या नदीचे महत्त्व सांगितले; म्हणून या नदीला सुवर्णमुखरी असेही नाव मिळाले. मात्र ते फारसे प्रचलित नाही, असे श्री विरुपाक्ष जंगम यांनी 'सुवर्णमुखरी अवतरण' अर्थात अमृतवाहिनी 'प्रवरा महात्म्य' या पुस्तकात नोंदविले आहे.

अमृतमंथन पर्वकाळात म्हणजे भगवान विष्णूंच्या अंगुष्ठ स्पर्श पर्वकाळात जलधारा प्रकटली; म्हणून या नदीला मोठ्या कौतुकाने महर्षी अगस्त्यमुनींनी 'पर्वरा' असे नाव दिले आहे, असे डॉ. अरुणा ढेरे यांनी 'प्रवरा खोरे'मध्ये नोंदविले आहे.

प्रवरा ही अमृतासारख्या श्रेष्ठ रसाची म्हणजे प्रवररसाची नदी आहे म्हणून ती प्रवरा नदी होय, असे ब्रह्मांडपुरात वर्णन आहे. ब्रह्मांडपुराणांतर्गत 'महालयामात्म्यात' नामोत्पत्ती सांगितली आहे. लोकभाषेत पर्वरा आणि प्रवरा यांचे 'पेहेरा' हे नाव प्रचलित आहे, असे डॉ. सहस्रबुद्धे म्हणतात. पद्मपुराणातही प्रवरेचा उल्लेख असल्याचे, गोपाळकवींच्या मराठीतील महाभारतात, अनुशासन पर्वात, म्हटले आहे, ह्या नोंदी 'प्रवरा खोरे' मध्ये केलेल्या आहेत.

कळसाईच्या लेकरांनी गोपालन आणि दुग्धव्यवसाय सुरू

केला. एका गौळणीला खाट्या गायीच सांभाळणे वाट्याला आले. तिचे दुःख खाट्या गायींना पाहावेना. खाट्या गायींनी तिला मध्यरात्री प्रवरेवर जाऊन दूध भरून घेत जा, असे सांगितले. मध्यरात्री प्रवरेत दुधाच्या धारा वाहू लागल्या. घागरी भरून गौळण दूध घेऊन जाऊ लागली. एका गौळणीने तिला विचारले ''तुझ्या गायी खाट्या एवढं दूध कुठून?'' गौळण म्हणाली, ''एक गाय प्रवरा माय!'', सर्वांना याचा प्रत्यय आला. तेव्हापासून लोकपरंपरेत प्रवरा क्षीरवाहिनी म्हणून ओळखली जाऊ लागली. असे 'चाळीसागाव डांगाण परिसर' या डॉ. अनिल सहस्रबुद्धे लिखित प्रबंधातील, लोककथा संग्रहातील, कथेच्या आधारे सांगितले जाते.

●●●

# ब) प्रवरा परिक्रमा संकल्प आणि महत्त्व

प्रभुरामचंद्रांच्या पावन पदस्पर्शाने अपरिमित प्रभावी झालेली; अमृतवाहिनी, पर्वरा, पेहरा, प्रवरा, क्षीरवाहिनी; अशा प्रवरेची परिक्रमा! सत्य-कृत, त्रेता, द्वापार युगात आणि कलियुगातही घडते आहे. परिक्रमा महर्षी अगस्त्य, वाल्मिकी, नारद, राम, पांडव, धौम्यऋषी, राष्ट्रकुट चालुक्य, यादव, पेशवे, अहिल्यादेवी यांनी केली असावी असे त्या-त्या संदर्भातील, मौखिक परंपरेतील स्थानमहात्म्याच्या कथांवरून म्हणता येते.

**१) प्रवरा नदी ही साक्षात अमृतधारा आहे.** समुद्रमंथन किंवा अमृतमंथन, या प्राचीन पौराणिक तथा ऐतिहासिक प्रसंगी, देवासूरांनी केलेल्या, समुद्रमंथनातून, क्रमाक्रमाने अनेक दिव्य रत्ने बाहेर पडली. सागरप्राशन करणाऱ्या, भगवान महर्षी अगस्तिमुनी आणि श्री भगवद्भक्त ब्रह्मर्षी नारदमुनी यांच्या उपस्थितीत, साक्षीने हा प्रसंग घडत होता. कालकूट विष आले. ते भगवान शिवांनी धारण केले. अखेर प्रत्यक्ष अमृतकलश प्रकटला. याच अमृतासाठी, अर्थात अमृततत्त्वासाठी हा खटाटोप होता! त्या अमृतावर प्रथम अधिकार कोणाचा? या प्रश्नावरून वितंडवाद सुरू झाला. भगवान श्री शिव, सागराचे सद्गुरू भगवान महर्षी अगस्त्यमुनी आणि भगवद्भक्त ब्रह्मर्षी नारदांनी, भगवान श्री विष्णूंना यातून मार्ग काढण्यासाठी विनंती केली. श्री भगवान विष्णूंनी सर्वांनाच संमोहित करणारे, मोहिनी रूप धारण केले. त्या रूपाने संमोहित झालेल्या देवासूरांनी मोहिनी देवींचे मार्गदर्शन घेणे मान्य केले. सर्व दिव्यरत्नांचे प्रथम पूजन करावे व नंतर अमृत वितरण करावे असा प्रथम प्रस्ताव देवांनी मांडला. म्हणून प्रथम देवांना व क्रमाने नंतर असूरांना अमृत

वितरित करावे; असे श्री मोहिनी देवींनी मार्गदर्शन केले. संमोहनामुळे देवासूरांना प्रस्ताव मान्य झाला. या परामर्शाप्रमाणे दिव्यरत्नांचे पूजन करण्यासाठी अतिप्राचीन असे आणि या प्रसंगाचे साक्षी असलेल्या सह्यगिरीवरील, एक स्थान, श्री मोहिनींनी निर्देशित केले. ते स्थान म्हणजे आजचा रतनगड किंवा रत्नगड होय!

रत्नगडावर दिव्यरत्नांचे पूजन सुरू असतांना भगवान महर्षी अगस्त्यमुनी आणि भगवद्भक्तशिरोमणी नारद यांनी श्री शिवांना आणि श्री मोहिनींना, देवासूरांप्रमाणे मानवांनाही अमृत मिळावे, अशी विनंती केली. भगवान शिवांनी करुणापूर्णतेने श्री मोहिनीस्वरूप भगवान विष्णूंना मानवांसाठी अमृत प्रदान करण्याची प्रार्थना केली. संमोहित देवासूरांच्या साक्षीने श्री विष्णूस्वरूपा मोहिनींनी आपल्या पदकमलाच्या अंगुष्ठस्पर्शाने, अमृतकलशाला धारा प्रवाहित करण्याची आज्ञा करताच; अंगुष्ठस्पर्शाने कललेल्या कलशातून अमृतधारा प्रवाहित झाली. हीच अमृतवाहिनी प्रवरा होय. 'प्रवरापानम् गोदा स्नानम्' अशी उक्ती तेव्हापासून प्रचलित आहे.

परिक्रमा करतांना रत्नगड परिसर, या अमृतवाहिनी प्रवरेच्या उगमस्थानापासून; तीर्थ घेत, प्रवरासंगमापर्यंत जावे आणि परिक्रमा करीत पुन्हा उगमस्थानी येऊन तीर्थ घ्यावे. या तीर्थ प्राशनाने आधीव्याधीमहाव्याधी आपसूकच नाहीशा होऊन; जीवन आरोग्यवान आणि आनंदी होते. प्रपंचात राहूनही मोक्षानुभूती घेण्याचा हा अत्यंत प्रभावी असा मार्ग होय. उगमस्थानी तीर्थप्राशनाने प्रत्यक्ष भगवान विष्णू, भगवान शिव, गोमाता, शक्तिस्वरूपिणी कळसूबाई आणि देवी अमृता अर्थात प्रवरा यांचे दर्शन घडून मानव देह पावन होतो. उगमस्थानीच्या प्रवाहातून प्रत्यक्ष अमृताचा लाभ मानवाला होतो. हा लाभ घेऊन उगमस्थानी हरिहर स्वरूप अमृतेश्वराचे पूजन करावे म्हणजे अमृततीर्थ प्राशन फलदायी होते. या अमृत प्राशनाने अमर होता येत नसते. मृत्यू अर्थात देहविसर्जन अपरिहार्य आहे. अमृतप्राशनाने दिव्य आरोग्यप्राप्ती,

मानसिक प्रसन्नता आणि सच्चिदानंद अनुभूती मात्र नक्कीच प्राप्त होते.

**२) भगवान महर्षी अगस्त्यमुनी विद्या–सामर्थ्याचा लाभ :–**

प्रवराखोरे हे दंडकारण्यातील तपोवनांतर्गत, अगस्त्यपूर क्षेत्र होय. अमृतेश्वरांची स्थापना आणि देवीमाता अमृतवाहिनीची उत्पत्ती, यांमध्ये महर्षी अगस्त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. महर्षींच्या विश्व व्यवस्थापन प्रक्रियेतील स्वीकृत आणि सोपविलेल्या, व्यवस्थापन कार्याची, प्रयोगसिद्धी, उपयोजनसिद्धी आणि सुनियंत्रण सिद्धी यासाठीच्या प्रत्यक्ष कार्याकरिता महर्षींनी प्रवरातीरी अगस्तपूर क्षेत्रात, अर्थात अगस्त्यपूर म्हणजे अकोले येथे, केंद्रीय आश्रम स्थापन केला. प्रवरेच्या उत्तर आणि दक्षिण तीरावर त्यांची साधना केंद्रे असल्याचे; अलिकडील काळात पुन्हा प्रत्ययास येत आहे. सिद्ध श्री किसनगिरी महाराज यांना साक्षात्कार देऊन; सिद्धीयोग आणि अध्यात्मविद्या प्रसार कार्यासाठी महर्षी अगस्त्यांनी आज्ञांकित केले. सिद्ध श्री किसनगिरी महाराजांनी गोधेग्राम या प्रवरेच्या; आढळा–म्हाळुंगी–मुळा–प्रवरा संगमोत्तर आणि गोदासंगमपूर्व अशा क्षेत्रात; नित्य भगवान महर्षी अगस्त्यमुनी यांचे दर्शन घेऊन; सिद्धियोग आणि अध्यात्मविद्या तपस्यापूर्वक प्राप्त केली. त्यांनी जनकल्याण आणि अध्यात्म प्रचार कार्यास वाहून घेतले. त्यासाठी प्रवरेच्या उत्तर तीरावर गोधाग्रामी, महर्षी अगस्त्यांचे साधनास्थळ प्रकट झाले आहे. महर्षीचे मंदिर आता तेथे विराजमान असून; अग्राई म्हणजेच इग्मवाह तथा दृढस्यूत या अगस्तिपुत्रांची माता, अर्थात लोपामुद्रा यांचे मातृकादेवीस्थान आहे. दक्षिण तीरावर सिद्ध श्री किसनगिरी महाराज यांचे साक्षात्कारी, सिद्ध असे देवगड पीठ आहे. श्री किसनगिरी महाराजांची संजीवन समाधी येथे असून; या स्थळाचा भगवान दत्तात्रयांचे सिद्धपीठ म्हणून विकास झाला आहे. येथे भगवान महर्षी अगस्त्यमुनी पंचायतनाची स्थापना केलेली असून, अमृतवाहिनी प्रवरामाता प्रयागतीर्थावर सुंदर घाट बांधला आहे. येथून होडीने पलीकडे उत्तर तीरी महर्षींच्या दर्शनार्थ जाता येते. सिद्ध श्री संत किसनगिरी महाराजांचा वारसा संत श्री भास्करगिरी महाराज पुढे

नेत आहेत. गोदा प्रवरा संगम अर्थात कायगावटोके या जोड गावास काशी क्षेत्राची महानता प्राप्त झाली आहे. या स्थानी पेशवेकालीन, खास उभारलेले, अगस्त्य पंचायतनामधील श्री सिद्धेश्वरांचे स्थान आहे. तसेच अगस्त्य पंचायतनाचे दर्शन घडते. येथे अगस्त्य विद्येची फलप्राप्ती होते.

प्रवरेच्या उत्तर तीरावर अगस्त्य पंचायतनातील महत्त्वाचे स्थान म्हणजे कुंभेफळ या गावचे शेषनाग सिंहासनावर विराजमान नारायण अर्थात भगवान विष्णूंचे एकमेवाद्वितीय स्थान होय. विश्वाच्या व्यवस्थापन कार्यात महर्षी अगस्त्यांना सतत प्रेरणा देत अष्टभैरवांना सहाय्यभूत होणारे हे विष्णूमंदिर, भगवान विष्णूंच्या धारणाशक्तीचे अलौकिक दर्शन घडविते.

श्री क्षेत्र नेवासा येथे, म्हणजे निधीनिवासी, महाशक्ती मोहिनींचे मोहिनीराज यांचे दर्शन, महर्षी अगस्ती आणि ब्रह्मर्षी नारद यांच्या साक्षीने घडते. त्याचबरोबर मोहिनीचे महालया अर्थात म्हाळसा अवतार प्राकट्य स्थानाचे दर्शन घडते. महर्षी अगस्त्यांनी प्रवरेच्या उत्तर तीरावर, ब्रह्मर्षी नारदांचे चिरवास्तव्य असावे; म्हणून नारदेश्वर मंदिर स्थापित केले आहे. त्याचे समाजकंटकांनी दर्ग्यात रूपांतर केले होते. आता मोहिनीराज, महालया म्हाळसा भक्तांनी नारदमंदिराचे पुनरुज्जीवन कार्य सुरू केले आहे. प्रवरेच्या दक्षिण तीरावर स्थित नेवासा येथे महर्षी अगस्त्य कृपेने अद्वैतविद्येचा वाङ्मयविलास; संतशिरोमणी श्री माऊली ज्ञानेश्वर यांच्या मुखाने आणि सिद्धसंत माऊली निवृत्तीनाथ कृपेने, सच्चिदानंद बाबांच्या हस्ते अमृतवाहिनी तीरी घडला. हा वृत्तांत अगस्त्य कादंबरीत वर्णन केला आहे. दक्षिण तीरावर याच भूमीत शक्तिमाता रेणुका, भवानी, अंबाबाई आणि चतुश्रृंगी यांच्या स्वयंभूप्राकट्यासह कुंभोद्भव महर्षी अगस्त्यमुनींचे, आयुर्वेद सिद्धपीठ, प्रकाशमान झाले आहे. रांजणगाव देवी या नावाने प्रसिद्ध असलेल्या या ग्रामी, अग्याच्या टेकडीवर महर्षींचे सिद्धपीठ आहे. अशा प्रकारे भगवान महर्षी अगस्त्यमुनी

यांच्या तपःसामर्थ्याने अमृतवाहिनी पर्वरा, पेहेरा, क्षीरवाहिनी प्रवरा खोरे प्रभावित आहे. संपूर्ण महर्षी अगस्त्यविद्या अर्थात धनुर्वेद, आयुर्वेद, ज्योतिर्वेद, जलव्यवस्थापन, पर्यावरण व्यवस्थापन, कृषीव्यवस्थापन, प्राणीव्यवस्थापन, अध्यात्मविद्या, सिद्धीसाधना, न्याय नीती, वाङ्मयविद्या अशा सर्व प्रकारच्या विद्या साधनेतील महर्षींच्या साधनेच्या प्रभावाने प्रवरा खोरे भारित आहे. भगवानमहर्षी अगस्त्यमुनीकृपेने, प्रतिभा, प्रज्ञा जागृत होते आणि विद्यासाधनेत गति प्राप्त होऊन यश प्राप्त होते. हे प्रवरा परिक्रमेचे दिव्यत्व होय.

**३) प्रभुरामचंद्रांचे अनुचर होण्याचे भाग्य लाभते :-**

महर्षी अगस्त्य बंधू महर्षी वसिष्ठ शिष्य, इक्ष्वाकुवंशीय, रघुकुलभूषण, प्रभुरामचंद्रांनी वनवासाचा अंतिमकाल भगवान महर्षी अगस्त्यमुनींच्या सान्निध्यात व त्यांच्या मार्गदर्शनाखाली व्यतित केला. याचा विस्तृत वृत्तांत, महर्षी वाल्मिकींनी रामायणात लिहिला आहे. प्रभुरामचंद्र आजच्या अकोले येथील महर्षी अगस्ती आश्रमात आले. भगवान अगस्त्यमुनींनी त्यांना गोदातीरावर पंचवटी क्षेत्रात, आश्रम उभारून, वास्तव्य करण्याची आज्ञा केली. महर्षींशी प्रभूंचा नित्य परामर्श होता. महर्षींनी प्रभुरामचंद्रांना अकोले येथील याच केंद्रीय आश्रमात, दिव्य खड़ग, अक्षयबाणाभाता, दिव्यबाण आदी दिव्य अस्त्रशस्त्र प्रदान केली. प्रभुरामचंद्रांनी महर्षींच्या विद्येने भारलेल्या प्रवरा खोऱ्यात प्रवरेची एकप्रकारे प्रथम परिक्रमा केली. सीता अपहरणापूर्वी केलेल्या या प्रवरा परिक्रमेत प्रभुरामचंद्र श्रीसीतामाई आणि श्रीरामभक्त बंधू लक्ष्मण यांनी प्रवरेच्या उत्तर आणि दक्षिण तीरावर शिवआराधना केली. यामुळे या प्रत्येक शिवस्थानाला हरिहरभेटीचे, अर्थात शिवविष्णू अद्वैताचे महत्त्व आहे. अमृतेश्वर श्री सिद्धेश्वर, रामेश्वर, कोल्लाळेश्वर, हरिहरेश्वर अशी अक्षरशः अनेक स्थाने प्रवरातीरी निर्माण झाली आहेत. तातोबाचा अर्थात महर्षी वाल्मिकींचा मठ रंधा धबधब्याच्या खाली उत्तर तीरावर स्थित आहे. भगवती सीतामाईंच्या उत्तर वनवासातील लवकुश जन्म, संगोपन

आणि रामायण कथन या ठिकाणी घडले. नदीतीरावर ‘सीतापाऊल’ असे दिव्य स्थान आहे. निळवंडे धरणाच्या पाणीसाठ्यातून या स्थानापर्यंत जाण्यासाठी पर्यटकांना मोटरलाँच उपलब्ध आहे. प्रभुरामचंद्रांविषयीच्या या शिवविष्णूअद्वैताच्या कथा पांडवांच्या वनभ्रमंती काळात; प्रवरातीरी महर्षी धौम्य ऋषींनी पांडवांना सांगितल्या. प्रवराखोरे ही अद्वैताची पेठ आणि संतांची भूमी म्हणून प्रसिद्ध झाली! या पावनतीर्थाच्या परिक्रमेने शिवविष्णूअद्वैतत्त्व, परिक्रमा करणाऱ्या भक्ताच्या ठायी प्रभावित होऊन; सच्चिदानंद स्वरूप अमृतभावानुभूती घडते. प्रवरा खोरे असे अध्यात्मिक सुगंधाने भारलेले आहे. म्हणूनच रामभक्त चिरंजीवी श्री हनुमान प्रवरामातेची नित्य परिक्रमा करतात.

**४) महाराष्ट्राचे लोककुलदैवत शिवस्वरूप श्री मार्तंडभैरव खंडेराय यांच्या महालया परिणयाने ही भूमी शिवशिवा अद्वैताचा अमृतानुभव श्री ज्ञानेश्वरमाऊली मुखाने भक्तांना देते.** प्रवरेच्या उत्तर तीरावर मोहिनी रूप मोहिनीराजांनी, ब्रह्मर्षी नारदांच्या साक्षीने, महालया अर्थात म्हाळसाई अवतार धारण केला. ते नेवासा येथील महालया म्हाळसापीठ, शिवशक्तीचे जागरण करते. मोहिनींच्या संमोहक रूपावर संमोहित झालेल्या शिवांनी, मोहिनीदेवींचा भार्या म्हणून स्वीकार करण्याची वांच्छा केली. मोहिनींनी मार्तंडभैरव या लोककल्याणकारक अवतारात, शिवांची ही वांच्छा पूर्ण होईल असे वचन दिले. नेवासा येथे दक्षिण तीरावर मोहिनीराजांचे अर्धनारी स्वरूपात दिव्य दर्शन घडते; तर उत्तर तीरावर महालया म्हाळसांचे दर्शन घडते. कृतयुगापासूनची शिवविष्णूअद्वैताची ही परंपरा परिक्रमा करणाऱ्या भक्तांना अनुभवता येते. जीव शिव होतो. ह्याच महालया म्हाळसांनी प्रवरेच्या उत्तर तीरावर महर्षी अगस्त्यमुनींच्या आश्रम परिसरात घोर तपश्चर्या करून; मार्तंडभैरवांना अर्थात खंडेरायांना प्राप्त केले. ते शिवविष्णूअद्वैताचे दिव्यस्थान; निळवंढे-म्हाळादेवी प्रकल्पाच्या सान्निध्यात, म्हाळादेवी या नावाने वसलेल्या, नगरीत आहे. या लोकदैवतांचे दर्शन म्हणजे लोकजीवनाची धन्यता होय!

**५) मोहिनीराज आणि सर्व देवदेवतांच्या भाववैभवात जाण्याचे भाग्य :-**

श्री मोहिनींनी अमृतवितरणाचे काम सुरू केले; तेव्हा देवांची आवली अर्थात रांग एका बाजूला आणि दानवांची रांग एका बाजूला होती. या पंगतीत मायावी रूपाने राहू येऊन बसला. वाटणी करतांना राहूचे हे कपट इंद्रदेवांच्या लक्षात आले, परंतु तोपर्यंत राहूने अमृत प्राशन केले होते. ते उघड होताच देवदानवांचे युद्ध जुंपले. मोहिनीस्वरूप श्री विष्णूंनी आपले मूळ आयुध, सुदर्शनचक्र आवाहित केले. त्यामुळे मोहिनीचे उजवे अर्धे शरीर श्री विष्णूंचे मूळ रूपात प्रकटले आणि अर्धे शरीर मोहिनी देवींचे राहिले. म्हणजेच अर्धनारी स्वरूप होऊन मोहिनींचे मोहिनीराज झाले. अशा अर्धनारी रूपात, भगवान विष्णूंचे विश्वातील एकमेव स्थान, निधीनिवास किंवा नेवासे येथे प्रवरेच्या दक्षिण तीरावर स्थित आहे. भगवान विष्णूंनी अर्थात मोहिनीराजांनी सुदर्शनाने राहूचा शिरच्छेद केला, परंतु एवढ्या अवधीत अमृत राहूच्या मुखात तसेच होते. ते शीर रत्नगडानजिक दक्षिण भागात स्थित असलेल्या आजच्या हरिश्चंद्र गडावर पडले. शीरामधून अमृत बाहेर पडले तेच मुळा नदीच्या रूपाने पुन्हा प्रवरेला येऊन मिळाले. असे शीर तुटूनही राहूदैत्याचे धड लढत होते तेव्हा दैत्यवध करण्यासाठी स्वतः भगवती सरसावल्या. त्यांनी मोठा कोलाहल करून राहूचा नाश केला. ते धड किंवा काया दूर जाऊन पडली. मुळा नदीच्या तीरी प्रसंगाची साक्ष देत राहू-अरी अर्थात आजच्या राहुरी शहराच्या रूपाने प्रकट आहे. राहू दैत्याला, अमृत, भगवानविष्णूंचे सुदर्शन आणि भगवतींची शक्ती यांचा स्पर्श झाल्याने त्याचा उद्धार झाला आणि सूर्यमालेत स्थान मिळाले. दक्षिण काशी प्रवरासंगम येथे त्याची साक्ष कायगावी मिळते. भगवतीच्या कोलाहलामुळे त्यांचे उग्र रूप निर्माण झाले. भगवान विष्णूंनी त्यांना शांत केले. या प्रसंगाची साक्ष, प्रवरेच्या उत्तर तीरावर कोल्हारभगवतीपूर ही जोड ग्रामे देतात. देवांच्या आवली जेथे बसल्या होत्या ते स्थान देवावली अर्थात देवळाली हे ग्राम होय. हे स्थान प्रवरेच्या उत्तरतीरी

निर्माण झाले. समुद्रमंथनाशी निगडित दिव्यकथांनी अमृतवाहिनीचे रूप अधिकच दिव्य अनुभूती देते. प्रवरेच्या गॅझेटमध्ये डॉ. अरुणा ढेरे यांनी या कथांची नोंद केली आहे. तशाच काही पर्यायी कथाही नोंदविल्या आहेत.

**६) बिल्वतीर्थाचे दर्शन :–**

प्रवरेच्या उत्तर तीरावर हरिहरेश्वर हे प्रसिद्ध स्थान आहे. 'श्री केशव गोविंद महात्म्य' ग्रंथात पुराण कथा समाविष्ट आहे. प्रवरेकाठी बिल्ववनात शिवपार्वती विहारासाठी आले. बिल्ववनात त्यांचे मन रमले. पार्वतीमातांना तहान लागली तेव्हा शिवांनी बेलाचे पान धरणीवर टाकून तीर्थ निर्माण केले. पार्वतीमातांची तहान शमली. भगवान शिवांनी त्या तीर्थाला आशीर्वाद दिला. 'तुझ्या ठिकाणी माणसाला चारही पुरुषार्थ सिद्धीचे सामर्थ्य प्राप्त होईल' असे वरदानही दिले. या तीर्थाशी जोडलेली आणखी एक महत्त्वाची कथा म्हणजे; त्रिपूर दैत्याच्या उपद्रवाने त्रासलेले देव इंद्रदेवांच्या नेतृत्वाखाली भगवान ब्रह्मदेवांकडे आले. ब्रह्मदेवांनी त्यांना भगवान विष्णूंकडे पाठविले. भगवान विष्णूंनी सर्व देवांसह, बिल्वतीर्थावर जाऊन भगवान शिवांची उपासना करण्याचा उपाय केला. तेथे श्री विष्णूंनी शिवलिंगाची स्थापना केली. भगवान शिवांनी प्रसन्न होऊन; त्रिपुरासुरापासून अभय प्रदान केले. श्री विष्णूंनी म्हणजे हरीने हराची उपासना केली; म्हणून हे लिंग हरिहरेश्वर म्हणून प्रसिद्ध झाले. भगवान शिवांनी इंद्र आणि विष्णूंना बिल्वतीर्थाच्या पश्चिमेला दोन लिंगे स्थापन करावयास सांगितली, हीच लिंगे आज श्री इंद्र आणि विष्णू यांनी स्थापन केलेल्या क्रमाने केशव आणि गोविंद, या नावांनी प्रसिद्ध आहेत. 'श्री हरिहर केशव गोविंद त्रिस्थला महिमा' या डॉ. सुभाष सोन्याबापू मेहेत्रे लिखित ग्रंथात याविषयी विस्तृत माहिती आली आहे.

याशिवाय बिडालक्ष दैत्याच्या उपद्रवाने भयभीत झालेल्या देवांनी पार्वतीमातेची उपासना करून विनवणी केली. पार्वती मातांनी बिल्ववनाच्या दक्षिणेला लिंग स्थापन करून शिवांची प्रार्थना केली.

प्रसन्न होऊन आशुतोष शिवांनी विडालाक्षाचा वध केला. बिल्ववनामुळे व पुराणकथांच्या प्रभावाने प्रवरातीरी निर्माण झालेल्या या नगरीला बेलापूर असे नाव प्रसिद्ध झाले. शिवाराधनेसाठी बेलापूर परिसरात आणि प्रवरेच्या उत्तर दक्षिण तीरांवर अनेक शिवलिंगे देवांनी स्थापन केली आहेत. त्यात ब्रह्मेश्वर, कालिकेश्वर, सूर्येश्वर, रामेश्वर, अमलेश्वर अशी कितीतरी शिवलिंगे आहेत. शिवविष्णू अद्वैताची ही प्रतिके होत. यांत इंद्रस्थापित इंद्रबिल्वेश्वर, वायूस्थापित अमलेश्वर, कुबेरस्थापित नीलेश्वर अशी अनेक स्थाने आहेत. प्रवरामाईंच्या उत्तर आणि दक्षिण तीरावर जवळपास प्रत्येक गावी वेगवेगळ्या नावाने शिवलिंग प्राचीन काळापासून आहे. ही शिवलिंगे प्रभूरामचंद्रांनी केलेल्या प्रवरा परिक्रमेची साक्ष देतात म्हणूनच रामभक्त हनुमान नित्य परिक्रमेसाठी येतात.

**७) विश्वातील एकमेव, विस्मयचकित करणारी मंदिरे :- खांबरुप देवांची मंदिरे**

**(१) केशव गोविंद स्तंभरूप देव :-** बेलापूरला बिल्ववनात इंद्र आणि विष्णूंनी स्थापन केलेली लिंगे जमिनीत लुप्त झाली. एका शूद्र म्हणविणाऱ्या कुलातील शिवभक्ताला ।। ॐ नमः शिवाय ।। या शिवषडाक्षरमंत्राची प्राप्ती झाल्यावर त्याला शिवांचे दोन वेळा बटुरूप दर्शन झाले. त्यानंतर त्याला स्तंभरूपाने त्या बटुरूप शिवांनी दर्शन दिले. या बटुरूपांत शिव आणि विष्णू असल्याचे सांगून त्यांच्या स्तंभरूप लिंगांची स्थापना करण्यास सांगितले. लोकपरंपरेत डांगु आणि नागु या दोन विठ्ठलभक्तांना पंढरीवारी वृद्धापकाळात करणे अशक्य झाल्यावर; हेच दोन बटू हरी आणि हर स्वरूपात स्तंभरूपाने त्यांच्यासमोर प्रकटले. प्रवरेतून चंदनाचे दोन ओणके वाहात आलेले त्यांना मिळाले. देवाची आज्ञा समजून केशव गोविंद स्वरूपात, या दोन बटूंची स्तंभदेव रूपाने या भक्तांनी स्थापना केली. श्री विष्णू हे शिवभक्त म्हणून त्यांचे केशव हे नाव हरांनी धारण केले तर विष्णूंचे भक्तांना भावणारे गोपालन करणारे गोविंद रूप; हे गोविंद नाव दुसऱ्या स्तंभाला दिले. शिवविष्णू अद्वैताचा

प्रत्यय, असा देवासूर संग्राम काळापासून आधुनिक काळापर्यंत येतो आहे. प्रवरा खोरे या गॅझेटमध्ये 'श्री केशव गोविंद महात्म्य' ग्रंथाच्या आधारे डॉ. अरुणा ढेरे यांनी ह्या कथा नोंदविल्या आहेत. या कथेचे अनेक पर्यायही लोकगंगेत प्रचलित आहेत. 'श्री हरिहर केशव गोविंद त्रिस्थली महिमा' या डॉ. मेहेत्रे लिखित ग्रंथातही या क्षेत्राची विस्तृत माहिती आहे.

**(२) नेवासे येथील जगद्‌विख्यात पैसाच्या खांबाचे मंदिर** :– निधीनिवास नेवासे या पुण्यभूमीत प्रवरेच्या उत्तर आणि दक्षिण तीरावर कोटी शिवलिंगे आहेत; असे मानले जाते. म्हणूनच नेवासे या क्षेत्राला काशी क्षेत्राचे महत्त्व आहे. यात श्री करवीरेश्वर अर्थात कनैरेश्वर नावाचे एक प्राचीन असे शिवालय होते. याच शिवालयातील सभामंडपात एका खांबाला टेकून श्री ज्ञानदेवमाऊलींनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील 'भावार्थदीपिका' म्हणजेच 'ज्ञानेश्वरी' सांगितली. त्या खांबावर करवीरेश्वरास नंदादीप लावण्याविषयी दिलेल्या वर्षासनाबाबतचा एक लेख कोरलेला आहे. एकप्रकारे श्री ज्ञानदेव मुखाने 'ज्ञानेश्वरी' हा नंदादीप चिरंतनासाठी प्रकाशित झाला असावा. या खांबाला प्रसाद खांबाचे अर्थात 'पसाय'चे म्हणजे 'पैसा'चे महत्त्व प्राप्त झाले. जणू भगवंत प्रत्यक्ष ज्ञान स्वरूप असे; या खांबातून प्रकटले. या पैसाच्या खांबाचा आशीर्वाद घेण्यासाठी मोठ्या भावभक्तीने श्रद्धेने भक्त, कलावंत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, लोकधुरिण मोठ्या ओढीने जगभरातून येतात आणि माऊलींकडून जणू शक्तिपाताचा लाभ घेतात.

**३) असाच अमृतानुभव – पैसाचा खांब** :– ह.भ.प. निवृत्तीमहाराज वक्ते यांच्या 'ब्रह्मचित्कलादर्शन अर्थात श्री मुक्ताबाई चरित्र व गाथा' या गीताप्रेस, गोरखपूरने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथातील उल्लेखाप्रमाणे, 'ज्ञानेश्वरी लिहून ही मंडळी नेवाशाहून ब्राह्मणीस गेली. तेथे ज्ञानेश्वर महाराजांनी ज्या खांबास टेकून अमृतानुभव सांगितला, तो खांब अजूनही ब्राह्मणीस आहे.' यावरून अमृतानुभव ब्राह्मणीस सांगितला, हे सिद्ध आहे. आजही तेथे

ब्राह्मणीस मुक्ताबाईचे मंदिर असून तिच्यापुढे रेडा आहे. मुक्ताबाई लहान असल्यामुळे जो पैठणला रेडा वेद बोलला, त्याच रेड्याच्या पाठीवर बसून मुक्ताबाई प्रवास करीत असे. मुक्ताबाई देवी असल्यामुळे तिचे वाहन रेडा आहे. त्या रेड्याच्या पाठीवर मुक्ताबाईच्या पादुका आहेत. ब्राह्मणीस शके १२१२ च्या कार्तिक वद्यात अमृतानुभव सांगितला. निवृत्तिनाथ म्हणाले, 'तुम्ही ज्ञानेश्वरी गीतेवरील टीका लिहिली, पण तुमचा 'सर्व खल्विदं ब्रह्म' याविषयीचा स्वतःचा काही अनुभव सांगा. म्हणून ज्ञानेश्वरांनी ब्राह्मणीस अमृतानुभव सांगितला.'

ह.भ.प. निवृत्तीमहाराज वक्ते यांच्या या उल्लेखाच्या आधारे आज आणि प्रत्यक्ष ब्राह्मणीतील मौखिक परंपरेप्रमाणे, ब्रह्मचित्कला म्हणजे मुक्ताई अर्थात ब्राह्मणी. ब्राह्मणी म्हणजे ब्रह्मज्ञानी. माऊली ज्ञानेश्वरांनी जेथे, ज्या खांबास टेकून श्री निवृत्तिनाथ कृपेने आपले, स्वतःच्या चिंतनातून स्वीकृत तत्त्वज्ञान, 'अमृतानुभव' स्वरूपात, १९ प्रकरणात ८११ ओव्यात, ब्रह्मचित्कला मुक्ताबाईंच्या समोर निरुपित केले तेथे त्यामुळे मुक्ताई ब्रह्मज्ञानी अर्थात ब्राह्मणी झाली. या प्रसंगाची आठवण म्हणजे ब्राह्मणी गाव. त्यातील मुक्ताई मंदिर आणि अमृतानुभव प्रसाद खांब अर्थात पैसाचा खांब या खुणा होत. वस्तुतः हे बल्लाळेश्वरांचे मंदिर होय. पाठीमागे शिवालय आहे. या मंदिरात मच्छिंद्रनाथांचे वास्तव्य झाले होते. येथे ही चारी भावंडे थांबली आणि अमृतानुभव प्रकट झाला. जणू बल्लाळेश्वरी मुक्ताई स्वरूपात अवतरल्या म्हणून हे मुक्ताईचेही मंदिर होय. येथून मुक्ताईंची पालखी दिंडी पंढरपुरास जाते.

नेवासा येथील वै.ह.भ.प. बन्सीमहाराज यांच्या पारंपरिक मताप्रमाणे, ज्ञानेश्वरी प्रसंगानंतर, लगोलग सद्गुरू निवृत्तीनाथ यांच्या आज्ञेने, 'अमृतानुभव' ग्रंथ निरुपण प्रसंग 'अनुभव-अमृत कथन' या स्वरूपात नेवासा येथील निवासातच बहुधा कनैश्वराच्याच मंदिरात घडला. हाही मतप्रवाह तेवढाच दृढ आहे.

**८) पंच-प्रयागांचे दर्शन आणि स्नान :- (प्रयाग म्हणजे नद्यांचा**

**संगम) :–**

**(१) प्रवरा संगम कायगाव–टोके :–** अमृतवाहिनी, क्षीरवाहिनी, पर्वरा, पेहरा, प्रवरा या नावाने प्रसिद्ध प्रवरा नदी, कृष्णवंती, आढळा, म्हाळुंगी आणि मुळा नद्यांना उदरात घेऊन श्री क्षेत्र टोके येथील सिद्धेश्वरानजिक गोदावरीला मिळते. आणि 'प्रवरापानम्, गोदा स्नानम्' असा महाप्रयाग अमृतयोग घडतो. दक्षिण काशी असे या प्रयागक्षेत्राचे महात्म्य आहे. श्री संत दासगणूंनी ब्रह्मपुराणाच्या आधारे लिहिलेल्या 'गौतमीमहात्म्य' या ग्रंथात– कायगाव–टोके या जोड गावींच्या या संगम क्षेत्राचे महात्म्य वर्णन केले आहे. प्रवरा नदीच्या अर्थात अमृतवाहिनीच्या टोकाशी टोकेगावी प्रवरा गोदेला मिळते. मोहिनीस्वरूप विष्णूंनी राहूंचा सुदर्शन चक्राने वध केल्यानंतर, भगवती आणि विष्णूंनी शीरविरहित लढणाऱ्या राहूची काया, अर्थात धड, संगमतीरावर, पलिकडे भिरकावले. ते जेथे पडले तेथे कायगाव निर्माण झाले. अमृत, सुदर्शन, भगवती आणि श्री विष्णूंच्या स्पर्शाने प्रवरेत पावन झालेली दुष्ट राहूची काया; संगमक्षेत्री पडली आणि राहू दैत्याचा उद्धार होऊन; सूर्यमालेत स्थान मिळाले. कायगाव–टोके ही अशी संगमाभोवतीची गावे पुण्यक्षेत्र झाली.

कायगाव जवळच सोमगंधर्वाने या तीर्थी गंधर्वांसाठी अमृत मिळविले. श्री सरस्वतींच्या कृपेने देवांसाठी संपूर्ण अमृत पुन्हा मुक्त केल्याची कथा सोमतीर्थाशी निगडित आहे. जवळच काळेश्वराचे स्थान आहे. पुरुरवाची कथा या शिवलिंगाशी जोडलेली आहे. शिवांनी निर्माण केलेल्या अंबिकावनात जो पुरुष प्रवेश करील त्याची स्त्री होईल असे वैशिष्ट्य होते. इल नावाचा राजा चुकून या वनात गेला. तो स्त्री झाला. त्याचे बुद्धराजाशी लग्न झाले. त्या इलास झालेला पुत्र पुरुरवा. मुलगा मोठा झाल्यावर, इलाने पुरुरवास वृत्तांत सांगून पुन्हा पुरुषत्वप्राप्तीची इच्छा व्यक्त केली. पुरुरव्याने शिवांना प्रसन्न करून उपाय विचारला. शिवांनी या क्षेत्री स्नान केल्यास, पुन्हा पौरुषप्राप्ती होईल असा वर दिला.

त्याप्रमाणे इलाचे स्त्रीत्व नदीरूप होऊन नदीला मिळाले. इला पुन्हा पुरुष झाली. काळेश्वर तीर्थी स्नान केल्यास पौरुष प्राप्ती होते. संगमक्षेत्राला उत्तर क्रियेच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. हा संगम मोक्षदायिनी आहे. या पवित्रतीर्थाविषयी अनेक कथा उपलब्ध आहेत. डॉ. अरुणा ढेरे यांनी 'प्रवरा खोरे' या गॅझेटमध्ये कथा नोंदविल्या आहेत.

**(२) (मुरला) मुळा प्रवरा संगम– पाचेगाव–संगमेश्वर :–** मुळा नदीचा उगम अजुबा आणि हरिश्चंद्र पर्वतात सांगितला जातो. बहुतेक लोक मुळेचा उगम हरिश्चंद्रपर्वतात झाल्याचे सांगतात. राहूच्या शिराची कथा जशी मुळेच्या उगमाशी जोडली जाते तशीच राजा हरिश्चंद्र, ताराम ती, रोहिदास अशी हरिश्चंद्राची स्थाने प्रत्यक्ष दाखवत, हरिश्चंद्राचे रांजण दाखविले जातात. विश्वामित्रांनी हरिश्चंद्राची सत्वपरीक्षा पाहण्यासाठी; डोंबाघरी पाणी भरायला भाग पाडले. पाण्याच्या रांजणाला मुळाशी म्हणजे बुडाशी छिद्र पाडून ठेवले. हे सत्व सिद्ध करणारे पुण्यमयी पाणी नदीरूपाने वाहू लागले. तीच मुळा होय. राहूने प्राशन केलेले अमृत शिरच्छेदामुळे वाहू लागले. ते त्याच्या मुखातील आणि शरीरातील अमृत निपटून काढण्यासाठी मोहिनीस्वरूप भगवान विष्णूंनी राहूला पायाच्या अंगठ्याने दाब दिला या प्रक्रियेत गुद्द्वाराद्वारे सुरा आणि मुखावाटे अमृत बाहेर पडले. त्यातील अमृतवाहिनी म्हणजे प्रवरा आणि शरीरमुळातून बाहेर पडली ती मुळा अशी आणखी एक कथा जोडली जाते. तसेच हरिश्चंद्रतीर्थाचे 'चंद्रिका' शक्तीतीर्थ म्हणून महत्त्व आहे. चंद्रिका शक्तीतीर्थाचा उल्लेख मत्स्यपुराण, स्कंदपुराण, देवीभागवतात आढळतो. या गडावरून मळगंगा अर्थात मंगलगंगा आणि हरिश्चंद्र सत्त्वतीर्थ अर्थात मुळा अशा दोन नद्यांचा उगम सांगितला जातो. सर्वतीर्थांचा आढळ या गडावर आहे. साधनेसाठीचे शक्तिपीठ म्हणून या गडाचे महत्त्व सर्वदूर माहीत होते. श्री चांगावटेश्वराने, येथे गुरुकुल स्थापन करून; चौदाशे वर्षे तप केले. नाथ, सिद्ध, शाक्ततांत्रिक या सर्वांच्या दृष्टीने हे महत्त्वाचे स्थान आहे. येथून निघालेली मुळा नदी नेवाशाच्या अलीकडे

पाचेगाव या पुण्यगावी प्रवरेला येऊन मिळते आणि अमृतवाहिनी आणि सत्त्वतीर्थांचा पुण्यमयी प्रयाग होतो. संगमस्थान म्हणूनच ते प्रसिद्ध असून संगमावर शिवांचे उपासनापीठ स्थापित आहे. ते पीठ प्रवरेच्या दक्षिण तीरावर आणि मुळेच्या उत्तर तीरावर असे संगमाच्या मध्ये उभे आहे. डॉ. अरुणा ढेरे यांनी या कथा नोंदविल्या आहेत.

**(३) म्हाळुंगी (महालंघी)– प्रवरा प्रयाग** :– पट्टागड किंवा विश्रामगड परिसरात उगम पावलेली महालंघी, म्हाळुंगी ही म्हाळसादेवींची आठवण करून देत, सिन्नर, अकोले, संगमनेर तालुक्यातून वाहात येऊन संगमनेर गावात प्रवरेला मिळते. या संगमावरूनच संगमनेर अर्थात संगमाच्या काठावरील नगर, असे संगमनेर हे प्राचीन नगर निर्माण झाले आहे.

**(४) आढळा (आरदळा) प्रवरा प्रयाग** :– ही नदी म्हाळुंगीच्या सान्निध्यातच पट्टा परिसरात उगम पाऊन, म्हाळुंगीच्या बरोबर वाहात येऊन; संगमनेरजवळच मंगलापूर अर्थात मंगळापूर येथे प्रवरेला मिळते आणि मंगल प्रयाग निर्माण होतो. याही कारणाने संगमनेर गावाला संगमनेर असे नाव असावे. आढळा ही आरदळा– तेजस्वीशक्ती प्रदान करणारी शक्तीदेवता म्हणून प्रसिद्ध आहे. समशेरपूरजवळ, टाकारी किंवा टाहाकारी या गावी एक प्राचीन शक्तीपीठ असून; प्राचीन सुंदर लेण्यांचा उत्तम नमुना आहे. कामशिल्पांचे सुंदर नमुने या मंदिरावर आहेत. १०५० चा शिलालेख आणि यादवकालीन हेमाडपंथी शिल्प शैलीचे एक मंदिरही येथे आहे. या प्रयागात ऊर्जालाभ होतो.

**(५) कृष्णवंती– प्रवरा प्रयाग** :– कळसूबाईच्या पायथ्याशी उगम पावणारी कृष्णवंती म्हणजे प्रत्यक्ष पार्वतीदेवींना वंदन करून; मोहिनीस्वरूपा श्री विष्णूंनी अर्थात श्रीकृष्णांनी मानवांवरील प्रेमाने प्रदान केलेल्या अमृतधारेत कृष्णभक्ती धारा समर्पित करण्यासाठी आवेगाने येणारी राधाच होय. खळाळती कृष्णवंती अर्थात प्रेमधारा राधा दक्षिण तीरावरील भंडारदरा गावासमोर उत्तर तीरावर अमृतमयी होते. या संगमाच्या रूपाने राधाकृष्णअद्वैत शिवशिवांच्या साक्षीने प्रकटते. त्या

अद्वैत योगाला आशीर्वाद देण्यासाठी जगन्माता महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती स्वरुपिणी शिवा घोरपड्याईच्या रूपाने पुन्हा प्रकटते, प्रेमाद्वैताचा हा कल्लोळ, मानवांच्या जीवनमुक्ततेसाठी दरीत झेपावतो. हाच रंधा येथील धबधबा.

**९) अलौकिक शक्तिपीठांचे दर्शन :–**

प्रवरासंगम येथील सिद्धेश्वर मंदिरात लक्ष्मीयंत्रासह लक्ष्मीदेवी, नेवासे येथील मोहिनीस्वरूपा आणि महालया म्हाळसादेवी, रांजणगाव देवी आणि भगवतीपूर येथे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचे दर्शन, सोनई–ब्राह्मणी येथे बल्लाळेश्वरी तथा संत मुक्ताई, अकोले येथील ज्येष्ठा कनिष्ठा आणि श्री महालक्ष्मी, रंधाफॉल येथील घोरपड्याई, कळसूबाई या अलौकिक शक्तिपीठांसह अनेक शक्तिपीठांचे दर्शन परिक्रमेत घडते.

**१०) परिक्रमा करतांना दिव्य दर्शनांचा अनुभव :–**

प्रवरामाता, शिव, पार्वती, विष्णूलक्ष्मी, खंडेराय–म्हाळसा, महर्षी अगस्त्य, लोपामुद्रा माता, ब्रह्मर्षी नारद, श्रीरामभक्त हनुमान, श्री गुरु दत्तात्रेय आणि माऊली यांचे या ना त्या रूपात परिक्रमा करतांना दर्शन घडतेच. अनुभव घ्यावा.

**११) पर्यटनस्थळांचे दर्शन :–**

१) भंडारदरा तलाव, भंडारदरा धरण २) घाटघर धरण, घाटण देवी ३) सांदणदरी (दिव्य प्रसिद्ध दरी) ४) रंधा येथील सुप्रसिद्ध धबधबा ५) निळवंडे धरण ६) जोरवे धरण ७) शनिशिंगणापूर ८) देवगड ९) प्रवरासंगम यात मुळा धरण आणि राहाता उपासनी महाराज, शिर्डी साईनाथ, सर्वतीर्थ टाकेद आदी स्थळांचा लाभ घेणे शक्य आहे. १०) साखरउद्योग भेट ११) ऐतिहासिक महत्त्वाची स्थळे. जोर्वे, दायमाबाद आणि नेवासे येथील उत्खनन स्थळे व अन्य. १२) ट्रेकर्ससाठी रतनगड, कळसुबाई आदी आव्हानात्मक सह्य शिखरे.

●●●

# क) प्रवरा परिक्रमा अशी करावी

१) प्रवरा परिक्रमा कोणत्याही महत्त्वाच्या पवित्र स्थळापासून सुरू करून त्याच स्थळी येऊन पूर्ण करावी. अतिवृष्टीचा काळ वगळून केव्हांही परिक्रमा करता येते.

२) उत्तर आणि दक्षिण तीरांवरून जेथून परिक्रमा सुरू केली जाईल तेथेच प्रदक्षिणा म्हणजे परिक्रमा पूर्ण होईल. परिक्रमा करतांना प्रवरासंगम आणि रतनवाडी येथेच प्रवरा ओलांडायची आहे तरच परिक्रमा होईल.

३) रतनवाडी, अकोले अगस्ती आश्रम किंवा अकोले श्री सिद्धेश्वर, संगमनेर, कोल्हार, देवळाली प्रवरा, बेलापूर, नेवासा उत्तर किंवा दक्षिण, देवगड, प्रवरासंगम, श्री सिद्धेश्वर मंदिर यांपैकी एखाद्या ठिकाणाहून परिक्रमा सुरू करणे सोयीचे होऊ शकते. संयोजकांनी तसे संयोजन करावे.

४) परिक्रमा सुरू करतांना परिक्रमेचा संकल्प करावा. प्रवरेचे पूजन करावे त्याचबरोबर श्रीगणेश, शिव, विष्णू, लक्ष्मी, अगस्त्य, नारद, हनुमान यांचेही पूजन करावे. शक्य त्याप्रकारे अन्नदान व अन्य दान करावे. परिक्रमा पूर्ण करतांना सांगता पूजन करावे. तसेच प्रवरा अमृत कुंभाचे स्वतःच्या घरात अमृतपूजन सोहळा करावा. पूजनात प्रवरेची आरती महत्त्वाची आहे तसेच प्रवरा वंदना अष्टक म्हणावे. पायी परिक्रमा जास्त फलदायी ठरते. दिव्यानुभूती येतात.

५) परिक्रमा करतांना व्रतस्त राहावे. सात्त्विक आहार ठेवावा. कोणत्याही स्वरूपाचे व्यसन करू नये. भजन, पूजन, जप, श्रवण,

कीर्तन यांत वेळ व्यतित करावा.

६) प्रत्येक दर्शन प्रसंगी पूजन अर्चन करावे.

७) परिक्रमा एकट्याने, पतीपत्नीने, आईवडील व अपत्य यांनी, सामूहिक स्त्रीपुरुष यांनी करावी.

●●●

# ड) परिक्रमेचा हेतू आणि फलश्रुती

अमृतवाहिनी प्रवरा जीवनदायिनी, पौरुषप्रदायिनी, आरोग्यदायिनी, लक्ष्मीदायिनी, यशदायिनी आहे. परिक्रमा करणाऱ्या व्यक्ती किंवा समुदायाने यापैकी कोणत्याही अपेक्षेने हेतुपूर्वक परिक्रमेचा संकल्प करावा. सर्वकल्याण हेतूनेही ही सामूहिक स्तरावर परिक्रमा करणे फलदायी होते. केवळ पर्यटन हेतूने परिक्रमा शक्यतो करू नये. पर्यटन, सहल आपसूकच घडेल. केवळ पर्यटनासाठी भ्रमंती करण्यासाठी प्रवास करतांनाही स्वतःच्या व अन्य कोणाच्या श्रद्धेला तडा जाणार नाही, याची काळजी घ्यावी.

संकल्प हेतूप्रमाणे फलप्राप्ती तात्काळ होते एवढे सामर्थ्य अमृतवाहिनीचे आहे. पायी पर्यटन करतांना शरीरशुद्धी व मनःशुद्धी होऊन एकप्रकारे वृत्तीपालट होऊन सात्त्विकवृत्ती वृद्धिंगत होते. आयुरारोग्य लाभते. संकटांवर मात करण्याचे सामर्थ्य प्रकटते. सर्वप्रकारचे नैराश्य नाहीसे होते. अमृतवाहिनी प्रवरा, शिवपार्वती, म्हाळसामार्तंड, विष्णू लक्ष्मी, प्रभु रामचंद्र, शक्तिमाता, हनुमान, नारद, महर्षी अगस्त्य, प्रवरा तीरावरील तपस्वी, यांची दिव्य दर्शने साधकांना कोणत्या ना कोणत्या स्वरूपात– पशू, पक्षी, वृक्ष आणि विभूती या स्वरूपात होतात.

प्रवरा तीरावर, महर्षी अगस्ती आश्रमात, श्री सिद्धेश्वर मंदिरामध्ये व संगमांवर हेतुपूर्वक किंवा संकल्पपूर्वक यज्ञ, याग, अभिषेक, पारायणे सिद्ध होतात. हेतू किंवा संकल्प सफलतेने पूर्ण होतो. विद्यार्थ्यांना विद्या–ज्ञान, धनार्थियांना धन, पुरुषार्थियांना पुरुषार्थ, विवाहेच्छुकांना विवाहसंपन्नता, अपत्येच्छुकांना इष्ट अपत्य प्राप्ती, जलार्थियांना उदंड जलप्राप्ती, आरोग्यार्थियांना आरोग्यप्राप्ती अवश्य होते. द्वंद्वे, वाद,

भांडणे आणि संकटे यांचे निवारण होते. यासाठी रुद्राभिषेक, अगस्त्य महात्म्य, पारायण, लोपामुद्रा चरित्र पारायण, प्रवरामहात्म्य पारायण, श्रीमद्भागवताचे आयोजन, श्री रामकथाज्ञानयज्ञाचे आयोजन करणे, अत्यंत शुभ फलदायी आहे.

टीप :- ज्या पर्यटकांना केवळ पर्यटन म्हणूनच प्रवास करावयाचा आहे त्यांना कोणत्याही अटी नाहीत. मात्र कोणाच्याही श्रद्धेला तडे जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. पर्यटकांना शनिशिंगणापूर, साकुरी (राहाता) येथील उपासनी महाराज, शिर्डीचे साईनाथ ही स्थळेही पाहता येतात. तसेच कळसुबाई, सर्वतीर्थ किंवा जटायूतीर्थ टाकेद याही गोष्टी पाहाता येतील.

●●●

# इ) प्रवरा परिक्रमेचा संकल्प
## (संस्कृत आणि मराठी)

**संस्कृत :–**

श्रीमद्‌भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य
अद्य ब्रह्मणो द्वितीये परार्धे विष्णूपदे श्री श्वेतवराहकल्पे
वैवस्वतमन्वन्तरे अष्टाविंशे युगचतुष्के कलियुगे
प्रथमचरणे जंबुद्विपे भरतवर्षे भरतखंडे दक्षिणापथे दंडकारण्ये
महाराष्ट देशे गोदावर्याः दक्षिणतीरे, प्रवराया दक्षिण । उत्तर तीरे,
बौद्धावतारे महर्षी अगस्त्य तथा श्रीराम क्षेत्रे आश्रमे

अस्मिन वर्तमाने शालिवाहन शके ......... नाम संवत्सरे ......... अयने ......... ऋतौ ......... मासे ......... तिथौ......... वासरे ......... दिवसनक्षत्रे शुभकामनायोगे शुभकरणे ......... स्थिते वर्तमान चंद्रे ......... राशिस्थिते सूर्ये ......... स्थिते देवगुरौ शेशेषु ग्रहेषु यथा यथां राशिस्थानस्थितेषु सत्सु एवं गुणविशेषविशिष्टायां शुभपुण्यतिथौ ममआत्मनः वेदोक्त तथा पुराणोक्त तथा लोकोक्त फलप्रात्यर्थं अस्माकं सकुटुंबानां सपरिवारानां द्विपदचतुष्पद सहितानां क्षेम, स्थैर्य, अभय, आयुरारोग्य, ऐश्वर्य, अभिवृध्यर्थं समस्त मंगल प्राप्त्यर्थं समस्त अभ्युदयार्थं, प्रवरा परिक्रमा सिध्यर्थं श्री प्रवरामाता देवता प्रित्यर्थ यथामिलिते उपचार द्रव्यैर्ध्यांना ऽऽ आवाहनादि षोडशोपचार द्रैव्यः पूजां करिष्ये.

**मराठी :–**

महाभागाशाली व पुरुषश्रेष्ठ, सर्वव्यापी विष्णूचे आज्ञेने वर्तमानकाली, आदिब्रह्माच्या दुसऱ्या परार्धात, विष्णूपदात, श्री श्वेतवाराहकल्पांत, वैवस्तवमन्वंतरामध्ये, २८ व्या युगचतुष्कांतील

कलियुगाच्या पहिल्या चरणात, जंबुद्विपातील भरतवर्षात (हिंदुस्थानात), दंडकारण्यात गोदावरीच्या दक्षिण तीरास, प्रवरेच्या दक्षिण/उत्तर तीरास, बौद्धावतारात श्री महर्षी अगस्त्य तथा श्रीराम क्षेत्रात, आश्रमात, शालिवाहन शकाच्या ...... संवत्सरात उत्तर/दक्षिण आयनात, ....... ऋतूत ......... मासात ...... पक्षात ...... तिथीस ...... वारी ....... दिवस नक्षत्रात शुभनाम योगात, शुभकरणात .......राशिस्थित चंद्र असतांना .......राशीत सूर्य असतांना .......राशीवर देवगुरू बृहस्पती असतांना आणि इतर ग्रह बरोबर आपापल्या राशीवर स्थित असतांना अशा विशेष गुणांनी श्रेष्ठ झालेल्या कल्याणकारक व पुण्यकारक अशा तिथीस मला स्वतःला वेदोक्त तथा पुराणोक्त तथा लोकोक्त फलप्राप्ती होण्यासाठी माझ्या कुटुंबाला क्षेम, स्थैर्य, दीर्घायुष्य, आरोग्य, ऐश्वर्य उत्कर्ष होण्यासाठी प्रवरामाता देवता प्रसन्न व्हावी म्हणून यथाशक्ती मिळालेल्या पूजासाहित्याने मी ध्यान आवाहनादी सोळा उपचारांनी प्रवरामातेची पूजा करतो/ते आहे.

●●●